**मा. श्री. राजगोपाल देवरा, पालक सचिव, कोल्हापूर जिल्हा यांचे अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक १८/१०/२०२१ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा वार्षिक योजना आढावा बैठकीचे इतिवृत्त.**

---

मा. श्री. राजगोपाल देवरा, पालक सचिव, कोल्हापूर जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक १८/१०/२०२१ रोजी जिल्हा वार्षिक योजना आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१. मा. जिल्हाधिकारी
२. मा. प्रशासक, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
४. मा. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
५. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
६. जिल्हा नियोजन अधिकारी, कोल्हापूर
७. सहायक आयुक्त समाजकल्याण कोल्हापूर
८. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर
९. कार्यकारी अभियंता, सा. बां. (दक्षिण) विभाग, कोल्हापूर
१०. कार्यकारी अभियंता, सा. बां (विशेष प्रकल्प) विभाग, कोल्हापूर
११. कार्यकारी अभियंता, सा बां विदयुत विभाग, कोल्हापूर
१२. कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर (प्रतिनिधी)
१३. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, कोल्हापूर
१४. उपवनसंरक्षक कोल्हापूर वनविभाग, कोल्हापूर
१५. विभागीय वनअधिकारी, सामाजिक वनीकरण, कोल्हापूर (प्रतिनिधी)
१६. विभागीय वनअधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर (प्रतिनिधभ्)
१७. सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास केंद्र, कोल्हापूर (प्रतिनिधी)
१८. जिल्हा जलसंधारण अधिकारी, कोल्हापूर
१९. अधीष्ठाता, सी.पी.आर कोल्हापूर (प्रतिनिधी)
२०. जिल्हा शल्य चिकित्सक, कोल्हापूर
२१. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, कोल्हापूर
२२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर
२३. जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर
२४. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर
२५. शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जिल्हा परिषद, कोल्हापूर
२६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

**२७. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**२८. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**२९. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**३०. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**३१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा प) जिल्हा परिषद, कोल्हापूर (प्रतिनिधी)**
**३२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**३३. शहर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर**

सभेच्या सुरुवातीस मा. जिल्हाधिकारी यांनी मा. पालक सचिव यांचे स्वागत केले. जिल्हा नियोजन अधिकारी यांनी जिल्हा वार्षिक योजना अर्थसंकल्पीत नियतव्यय, प्राप्त तरतूद व खर्च याबाबतीत मा. पालक सचिव महोदयांना अवगत केले.

जिल्हा नियोजन अधिकारी यांनी सन २०२०-२१ अंतर्गत रु. ३३०.०० कोटी इतका निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी रु. ३२८.५० कोटी इतका निधी खर्च झाला असल्याचे सांगितले.

जिल्हा नियोजन अधिकारी यांनी वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १४/१०/२०२१ अन्वये सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ अंतर्गत १०० टक्के नियतव्यय प्राप्त होणार असल्याचे सांगितले. यावर मा. पालक सचिव यांनी सध्या ५०% निधी वितरीत करण्यात आलेला आहे, १००% निधी प्राप्त होणार असल्याने पुढील दोन आठवडयात सर्व यंत्रणांनी आराखडयातील कामे प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करावीत व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही पूर्ण करावी अशा सुचना दिल्या.

मा. पालक सचिव यांनी राज्यातील सामान्य रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालये या करीता अर्थसंकल्पात मोठया प्रमाणात तरतूद केली आहे, कोल्हापूर जिल्हयातील जुनी बांधकामे व नवीन बांधकामे, वैदयकीय साहित्य यासाठी निधीची मागणी करावी व कामे पूर्ण करावीत अशा सुचना दिल्या.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी मागील वर्षाचे कंत्राटी कामगारांचे मानधनापोटीचे रुपये सात कोटी व औषधे व साधनसामुग्रीचे रुपये पाच कोटी देणे प्रलंबित असल्याचे सांगितले. यावर मा.पालक सचिव यांनी एकत्रि प्रस्ताव विशेष बाब म्हणून शासनाकडे पाठवावा असे निर्देश दिले.

जिल्हा नियोजन अधिकारी यांनी सन सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना २०२१-२२ करीता रु. ३७५.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत असून रु. ११३.४५ कोटी प्राप्त झाला आहे, सदर प्राप्त निधीमधून कोविड -- १९ अंतर्गत उपाययोजनाकरीता खर्च करण्यात यावा

अशा शासनाच्या सुचना असल्याचे सांगितले. आजअखेर कोविड -१९ उपायायोजना अंतर्गत रु. ६२.५० कोटीच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत व रु.२२.२७ कोटी खर्च झाला असल्याचे सांगितले. यावर मा. पालक सचिव यांनी खर्चाचे प्रमाण कमी असल्याचे सांगितले यावर मा जिल्हाधिकारी यांनी अदयापि बीम्स प्रणालीवर पुर्नविनियोजनाची सुविधा उपलब्ध करुन दिलेली नाही. कोविड – १९ उपाययोजने अंतर्गत कामांना "इतर जिल्हा योजना" या लेखाशीर्ष अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. कोविड – १९ अंतर्गत कामांना मुळ आराखडयात तरतूद नसल्याने, तरतूद उपलब्ध असलेल्या लेखाशीर्षामधून पुर्नविनियोजनाव्दारे निधी उपलब्ध करुन दयावयाचा आहे, पुर्नविनियोजनाची सुविधा बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

जिल्हा नियोजन अधिकारी यांनी नमूद केले की, शासनाकडून जरी रु. ११३.४५ कोटी प्राप्त झाला असला तरी सदरचा निधी वेगवेगळया लेखाशीर्षा अंतर्गत प्राप्त झाला आहे. कोविड- १९ अंतर्गत कामांना "इतर जिल्हा योजना" या लेखाशीर्ष अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. परंतु शासनाच्या सुचनेनुसार कोविड – १९ अंतर्गत कामांना पुर्नविनियोजनाव्दारे निधी उपलब्ध करावयाचा आहे. परंतु बीम्स प्रणालीवर पुर्नविनियोजनाची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे कोविड -१९ अंतर्गत निधी वितरणासाठी बीम्स प्रणालीवर पुर्नविनियोजनाची सुविधा तात्काळ उपलब्ध करणे आवश्यक आहे अशी विनंती केली.

मा. जिल्हाधिकारी यांनी सन २०२१-२२ मध्ये कोविड – १९ अंतर्गत रु. ६२.५० कोटीच्या प्रशासकीय मान्यता दिलेल्या आहेत, जिल्हयामध्ये १७ ऑक्सीजन जनरेशनचे प्लांट पूर्ण झाले असल्याचे सांगितले.

जिल्हा नियोजन अधिकारी यांनी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने प्रति विधीमंडळ सदस्य रु. ४.०० कोटी इतका निधी अनुज्ञेय केला असून प्रति विधीमंडळ सदस्य रु. १.५० कोटी प्रमाणे रु. १८.०० कोटी इतका निधी प्राप्त असून प्रशासकीय मान्यतेचे काम चालू असल्याचे सांगितले.

जिल्हा नियोजन अधिकारी डोंगरी विकास कार्यक्रम अंतर्गत १० डोंगरी पूर्ण गट असून आतापर्यंत प्रतिगट रु. १.०० कोटी प्रमाणे रु. १०.०० कोटी इतका निधी प्राप्त झाला असल्याचे सांगितले. मा. पालक सचिव यांनी प्रतिगट अनुज्ञेय निधी रु. २.०० कोटी प्रमाणे नियोजन करावे अशा सुचना दिल्या.

जिल्हा नियोजन अधिकारी खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२०-२१ व सन २०२१-२२ साठी निधी अप्राप्त असल्याचे सांगितले.

सहायक आयुक्त समाजकल्याण यांनी अनुसुचित जाती उपयोजना अंतर्गत सन २०२१-२१ अंतर्गत रु. ११६.६० कोटी इतका मंजूर व प्राप्त निधीतून रु. ११३.९७ कोटी खर्च झाला असल्याचे सांगितले.

सहायक आयुक्त समाजकल्याण यांनी सन २०२१-२२ अंतर्गत रु.११६.६० इतका निधी मंजूर असून ३०% रु. ३४.९८ कोटी निधी प्राप्त झाला आहे परंतु खर्च निरंक झाला असल्याचे सांगितले. यावर मा. पालक सचिव यांनी खर्च न झाल्याबाबत तसेच प्रशासकीय मान्यता न झाल्याबाबत नाराजी व्यक्त केली. कालावधी कमी असल्याने प्रशासकीय मान्यतेचे काम तात्काळ पुर्ण करण्यात यावे असे आदेश दिले.

कोविड – १९ आढावा – मा पालक सचिव यांनी कोरोनाच्या संभाव्य तिस-या लाटेबाबतच्या तयारीचा आढावा घेतला.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले की, तिसरी लाट ही दुस-या लाटेपेक्षा दिडपट जास्त असण्याची शक्यता असल्याने अतिरिक्त सुविधाबाबत (व्हेंटीलेटर्स, अतिरिक्त बेड इ.) तालुकानिहाय सर्व्हे करण्यात आला आहे. ज्या ठिकाणी पायाभुत सुविधा अपु-या आहेत त्या ठिकाणी सुविधा पुरविण्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे. यापुढे कोविड – १९ करीता मनुष्यबळ उपलब्ध होणार नसल्याचे शक्यता असल्याने जिल्हयातील १२ नर्सिग कॉलेजशी संपर्क साधून तिस-या वर्षातील विदयार्थ्यांची सेवा देण्यासाठी यादी अंतिम केली आहे.

प्रशासक, कोल्हापूर महानगरपालिका यांनी अंतिम वर्षाच्या एम.बी.बी.एस. विदयार्थ्यांची सेवा महानगरपालिकेकरीता मिळावी. परंतु अधीष्ठाता तशी परवानगी देत नसल्याचे सांगितले.

शेवटी सहायक आयुक्त समाजकल्याण यांनी मा. पालक सचिव यांचे आभार मानले व बैठक संपल्याचे जाहीर केले.

जिल्हा नियोजन अधिकारी,
कोल्हापूर

जिल्हाधिकारी व सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर